# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २६७**

**"महाविद्यालयाकडे शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग करण्याबाबत"**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उच्च व शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विद्यापीठ विभाग व महाविद्यालय/परिसंस्थामध्ये प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम घेण्यात येते. विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्राच्या प्रती घेण्यासाठी येतात त्यावेळी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम परत करण्यात यावी. तथापी ज्या विद्यार्थ्यांनी अनामत रक्कम नेली नाही अथवा मागणी केली नाही अशा शिल्लक राहिलेल्या आतापर्यंतच्या तसेच ०२ वर्षापूर्वीच्या अनामत रक्कमेचा विनियोग करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२३/प्र.क्र. ११९/विशि–५, दि. १३/१०/२०२३ अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

सबब, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, अनामत रक्कमेच्या विनियोगाबाबत शासन निर्णयामधील अनु. क्र. २ ते ४ मधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, ही विनंती.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४४५४ }
दिनांक : ०२/११/२०२३ }

प्रत :
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.**

DHEPN-MVI1011/16/2023-COLLWG1

I/146741/2023

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 7285
दिनांक : 26.10.2023
जावक दिनांक : 26-10-2023
विभाग : PG

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :mavi.** dhepune@gov.in
**फोन नं.**020/26122119,26051512,26130627,26124639 **फॅक्स नं.** 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/अनामत रक्कम/२०२३/ दिनांक: .१०.२०२३

Ph.D./M.Phil Unit
Inward No. 7183
Date : 26/10/23

## परिपत्रक

**विषय: अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकडे शिल्लक राहणा-या अनामत रकमेचा विनियोग करण्याबाबत.**

वाचा- शासन निर्णय क्र.: संकीर्ण २०२३/प्र.क्र.११९/विशि-५ दि. १३.१०.२०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकडे प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम जमा करुन घेण्यात येते. विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर सदर अनामत रक्कम विद्यार्थ्यांना परत करणे अभिप्रेत आहे. तथापी, काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम परत घेतली जात नाही व ती विद्यापीठ/महाविद्यालयांकडे शिल्लक राहते. सदर अखर्चीत रक्कमेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनाकरीता विनियोग होणे आवश्यक आहे.

विद्यार्थी विद्यापीठ/महाविद्यालयांमधून शिक्षण पुर्ण करुन प्रमाणपत्रांच्या प्रती घेण्यासाठी विद्यापीठ/महाविद्यालयांमध्ये येतो त्याचवेळी सदर विद्यार्थ्याची अनामत रक्कम परत करण्यात यावी. तथापी ज्या विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत अनामत रक्कम नेली नाही अथवा मागणी केली नाही अशा शिल्लक राहीलेल्या अनामत रकमेचा तसेच महाविद्यालयांकडील ०२ वर्षापुर्वी शिल्लक असलेल्या आतापर्यंतच्या अनामत रकमेचा विनियोग करण्याबाबत उपरोक्त 'वाचा' येथील शासन निर्णय दि. १३.१०.२०२३ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. (प्रत संलग्न) उच्च शिक्षण विभागाच्या कार्यकक्षेतील विद्यापीठे व महाविद्यालयांनी सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

अनामत रकमेच्या विनियोगाबाबत, उच्च शिक्षण विभागाच्या कार्यकक्षेतील, संबंधित विद्यापीठे/ महाविद्यालये यांचेकडून उपरोक्त शासन निर्णय दि. १३.१०.२०२३ मधील अनु.क्र. २ ते ४ या सूचनांचे पालन करण्यात येत आहे. याचा वेळोवेळी आढावा घेणे ही संबंधित विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांची जबाबदारी आहे.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 19-10-2023 11:58:45

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

DR - PG

Mr. Bhavari
27/10/23

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/...

३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित/ मॉडेल डिग्री महाविद्यालये महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकडे शिल्लक राहणा-या अनामत रकमेचा विनियोग करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२३/प्र.क्र. ११९ / वि शि ५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - १३/१०/२०२३

संदर्भ : - संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे क्र. उशिसं/ मवि-१/ अनामत रक्कम/२०२३/८७६०, दिनांक २/८/२०२३ रोजीचे पत्र

प्रस्तावना :

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांकडे प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम जमा करुन घेण्यात येते. विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर सदर अनामत रक्कम विद्यार्थ्याला परत करणे अभिप्रेत आहे. तथापि, काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडून सदर अनामत रक्कम परत घेतली जात नाही व ती विद्यापीठ/ महाविद्यालयाकडे शिल्लक राहते. सदर अखर्चित रक्कम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनाकरीता वापरावी याबाबत लोकप्रतिनिधिंकडून विधानमंडळात वारंवार विविध आयुधांव्दारे प्रश्न उपस्थित करण्यात येतात. सबब सदर अखर्चित अनामत रकमेचा विनियोग अकृषी विद्यापीठे / संबंधित महाविद्यालये यांनी कोणत्या बाबींसाठी करावा यासाठी सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** -

सदर शासन निर्णयान्वये विद्यापीठे/ महाविद्यालयांकडे जमा असलेल्या अनामत रकमेतून विविध उपक्रमांसाठी रक्कम खर्च करण्यास मान्यता देण्यात येत असून यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२. ज्यावेळी विद्यार्थी विद्यापीठ / महाविद्यालयामधून शिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्रांच्या प्रती घेण्यासाठी विद्यापीठ/ महाविद्यालयात येतो त्याचवेळी सदर विद्यार्थ्याची अनामत रक्कम परत करण्यात यावी. तथापी ज्या विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत अनामत रक्कम नेली नाही अथवा मागणी केली नाही अशा शिल्लक असलेल्या अनामत रकमेचा, तसेच महाविद्यालयांकडील २ वर्षापूर्वी शिल्लक असलेल्या आतापर्यंतच्या अनामत रकमेचा खालीलप्रमाणे विनियोग करण्यात यावा --

अ) <u>ग्रंथालयीन पुस्तके</u> - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षांची उत्तम तयारी होण्यासाठी प्रयत्नांचा एक भाग म्हणून महाविद्यालयीन स्तरावर सेंटर ऑफ एक्सलेंस तयार करणे तसेच महाविद्यालयाच्या स्तरावरील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केन्द्रामार्फत करीअरच्या संधी उपलब्ध होण्यासाठी स्पर्धा परीक्षांशी संबंधित पुस्तकांच्या व साहित्य खरेदी [illegible]

ब) <u>प्रयोगशाळा अद्यायावतीकरण</u> - प्रयोगशाळेकरिता नवीन उपकरण / साहित्य खरेदी करण्यासाठी शिल्लक अनामत रक्कमेचा वापर करण्यात यावा.

क) <u>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण</u> -

(I) बहुविद्याशाखीय शिक्षण पध्दती राबविण्यासाठी क्रिडा, संगीत या विषयांशी संबंधित २-३ क्रेडीटचे अभ्यासक्रम तयार केल्यास सदरचा अभ्यासक्रम राबविण्यासाठी, संगीत क्रिडाशी संबंधित साहित्य खरेदी करण्यासाठी शिल्लक अनामत रक्कमेचा वापर करण्यात यावा.

शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/ विशि-३ / शिकाना दि. २० एप्रिल २०२३ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीबाबत नियुक्त करण्यात आलेल्या सुकाणू समितीने अभ्यासक्रम श्रेयांक आराखडा सादर केला आहे. अभ्यासक्रम व श्रेयांक आराखडयाची राज्यामध्ये एकसमान प्रमाणात अंमलबजावणी होण्यासाठी दिलेल्या निर्देशानूसार Open Elective Courses (OE), Vocational Skill Courses (vsc), Ability Enhancement Courses (AEC), Indian Knowledge System (IKS) and Value Education Courses (VEC) याबाबत अभ्यासक्रमपुरक बाबींचा श्रेयांकात अंतर्भाव केल्यामुळे, पुर्नरचित शिक्षण पध्दतीच्या अंमलबजावणीसाठी अभ्यासक्रम पुरक बाबीकरीता महाविद्यालयांना येणारा खर्च, विद्यार्थीकेंद्रीत शिक्षण पध्दती विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या जमा असलेल्या अनामत रकमेतून करण्यात यावा.

(II) "नाबार्ड कन्सलटन्सी सर्व्हिसेस" (NABCONS) ही नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲंड रूरल डेव्हलपमेंट (NABARD) ची उप कंपनी आहे. सदर संस्था कृषी, ग्रामीण विकास व इतर संबंधित क्षेत्रात सल्ला प्रदान करते. देशभरात कृषी व ग्रामीण विकासाच्या धोरणात्मक क्षेत्रात सल्लागार आणि सल्ला सेवा देणारी प्रमुख संस्था आहे. NABCONS ही संस्था आर्थिक क्षेत्रातही कार्यरत आहे. राज्यातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी NABCONS ही संस्था करीत असलेल्या वित्तीय उपक्रमांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळण्याकरिता तसेच पुरक अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च हा विद्यार्थ्यांच्या जमा असलेल्या अनामत रकमेतून करण्यात यावा. वित्तीय साक्षरतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या NABCONS वा तत्सम शासकीय / निमशासकीय नियामक संस्था / केन्द्र शासन / राज्य शासनाच्या मालकीच्या संस्था / शासकीय कंपन्या यांच्या वित्तीय साक्षरता उपक्रमांकरिता महाविद्यालयाकडून प्रति विद्यार्थी कमाल मर्यादा रुपये ५००/- पर्यंत खर्च करता येईल.

ड) <u>शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणासाठी</u>

३. उपरोक्त नमूद उद्देशांसाठी महाविद्यालयाकडे शिल्लक राहणारी अनामत रक्कम ही वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र २०१३ / प्र.क्र. ३०/ २०१३/ विनियम,भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये **प्रदान वित्तीय अधिकाराच्या मर्यादेत खर्च करण्याचे अधिकार सर्व कुलगुरु, अकृषी विद्यापीठे /सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना राहील.**

४. प्रस्तूत प्रकरणी सर्व कुलगुरु अकृषी विद्यापीठे/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या वित्तीय मर्यादे बाहेरील खर्चास मान्यता देण्याचे अधिकार यथास्थिति वित्त विभागाच्या उपरोक्त नमूद दिनांक १७ एप्रिल, २०१५ मध्ये नमूद वित्तीय अधिकाराच्या मर्यादेत संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना राहील.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३१०१३१८४३५३५१०८ असा आहे .सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT
MADHUKARRAO
BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.10.13 18:46:15 +05'30'

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
कुलगुरु / कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर,
जिल्हा कोषाधिकारी, मुंबई / पुणे,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती (विशि-५).